सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४

# मुंबई वन्य जनावरे आणि वन्य पक्षी संरक्षण अधिनियम, १९५१

(दिनांक ३ जुलै, २००६ पर्यंत सुधारित)

*Bombay Act No XXIV of 1951*

# THE BOMBAY WILD ANIMALS AND WILD BIRDS PROTECTION ACT, 1951

*(As modified up to the 3rd July 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित.
२००६

[ किंमत : ५.०० रुपये ]

# मुंबई वन्य जनावरे आणि वन्य पक्षी संरक्षण अधिनियम, १९५१

अनुक्रमणिका

उद्देशिका

प्रकरण एक

**प्रारंभिक**

कलमे


१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ . . . . . . . . . . . . . . .

२. व्याख्या . . . . . . . . . . . . . . . . . . . .

३. पाळीव व बंदिस्त असलेली इतर जनावरे व पक्षी यांना सूट . . . . . .


प्रकरण दोन

**अधिनियमाखाली नियुक्त करावयाचे प्राधिकारी किंवा प्रस्थापित केले जाणारे प्राधिकरण**


४. वन्य प्राणिरक्षा अधिकारी, वन्य प्राणिरक्षक व इतर वन्य प्राणि अधिकारी यांची नियुक्ती. . . .

५. वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याने अधिकारांचे प्रत्यायोजन करणे . . . . . . . . . . .

६. राज्य वन्य प्राणि सल्लागार मंडळाची रचना . . . . . . . . . . . . .

७. राज्य वन्य प्राणि सल्लागार मंडळाची कर्तव्ये . . . . . . . . . . .

८. राज्य वन्य प्राणि सल्लागार मंडळाची कार्यपद्धति . . . . . . . . . .


प्रकरण तीन

**जनावरांची व पक्ष्यांची शिकार करणे**

**क-अनुज्ञप्ति**


९. वन्य जनावरे व पक्षी यांची अनुज्ञप्तीशिवाय शिकार करण्यास मनाई . . . . . .

१०. शस्त्रे बाळगणाऱ्या विवक्षित व्यक्तींची नोंदणी करणे . . . . . . . . . . . .

११. अनुज्ञप्ती मिळविण्याची कार्यपद्धति . . . . . . . . . . . . . . .

१२. शिकार केलेल्या श्वापदासंबंधी अभिलेख ठेवणे व सादर करणे . . . . . . .

१३. विशेष प्रयोजनांसाठी अनुज्ञप्ति देणे . . . . . . . . . . . . . . .

१४. अनुज्ञप्ति तहकूब किंवा रद्द करणे . . . . . . . . . . . . . . .

१४-क अपील . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

### ख-सर्वसाधारण


१५. पिलाची व पिलासोबत असलेल्या मादीची शिकार करण्यास मनाई . . . . . . . . . . . . . .

१६. शिकारबंदीचा कालावधि . . . . . . . . . . . . . . . . . . . .

१७. शिकारीची बेकायदेशीर पद्धति . . . . . . . . . . . . . . . . .

१८. विवक्षित जनावरे व पक्षी उपद्रवकारक प्राणि जाहीर करणे . . . . . . . . . .

१८-क. श्वापदास कलम ३६ व ३७ लागू असणे. . . . . . . . . . . . . . . . .


प्रकरण चार

### श्वापदांची अभयारण्ये


१९. कोणतेही क्षेत्र श्वापदांचे अभयारण्य म्हणून जाहीर करण्याची शक्ति. . . . . . . . . . .

२०. श्वापदांचे अभयारण्य जाहीर करण्यासंबंधी अधिसूचना. . . . . . . . . . . . . . .

२१. श्वापदांच्या अभयारण्यात समाविष्ट असलेल्या जमिनीबाबत कोणतेही अधिकार उपार्जित करण्यास प्रतिबंध. . .

२२. जिल्हाधिकाऱ्यांची उद्घोषणा . . . . . . . . . . . . . . . . . . . .

२३. जिल्हाधिकाऱ्याकडून चौकशी . . . . . . . . . . . . . . . . . . .

२४. अधिकार विलोप . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

२५. ज्या जमिनीवर अधिकार सांगितला असेल अशी जमीन संपादन करण्याची शक्ति . . . .

२६. जमीन संपादनाची कार्यवाही . . . . . . . . . . . . . . . . . . .

२७. जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकाराचा वापर इतर अधिकाऱ्यांनी करणे . . . . . . . . .

२८. श्वापदांच्या अभयारण्यात प्रवेश करण्यावर निर्बंध . . . . . . . . . . . . .

२९. श्वापदाच्या अभयारण्यात प्रवेश करण्यासाठी किंवा राहण्यासाठी परवाना . . . . .

३०. श्वापदांच्या अभयारण्यात परवान्याशिवाय शिकार करण्यास मनाई . . . . . . . .

३१. परवाना नाकरणे किंवा रद्द करणे . . . . . . . . . . . . . . . . . .

३२. आग लावण्यास मनाई . . . . . . . . . . . . . . . . . . . . .


प्रकरण पाच

### मृगयाचिन्हे आणि पाळीव जनावरे व पक्षी


३३. अनुज्ञप्तीशिवाय मृगयाचिन्हे व पाळी व जनावरे यांचा व्यवसाय करण्यास मनाई . . . . . .

३४. मृगयाचिन्हे व पाळीव जनावरे यांच्या विक्रेत्यांची अनुज्ञप्ति . . . . . . . . . . .

३५. मृगयाचिन्हांच्या व पाळीव जनावरांच्या विक्रेत्यांनी अभिलेख व विवरणे तयार करणे . . . .

३६. मालकीचे प्रमाणपत्र . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

३७. मृगयाचिन्हांची निर्यात व विक्री विनियमित करणे . . . . . . . . . . . . . .

३८. सरकारी मृगयाचिन्हे . . . . . . . . . . . . . . . . . . . .

३९. सरकारी मृगयाचिन्ह कब्जात असल्याबद्दल कळवणे . . . . . . . . . . . .

४०. सरकारी मृगयाचिन्हे बेकायदेशीरपणे कब्जात ठेवणे किंवा त्यांचा बेकायदेशीर व्यापार करणे . .

४१. वन्यप्राणि रक्षा अधिकाऱ्यापुढे हस्तिदंत किंवा शिंग दाखल करणे . . . . . . . .

४२. हस्तिदंत किंवा शिंग यांची नोंदणी करणे व त्यावर ओळखचिन्हे करणे . . . . . .

४३. मालकीच्या प्रमाणपत्राशिवाय हस्तिदंत किंवा शिंग यांचे हस्तांतरण करता न येणे . . . .

प्रकरण सहा

**अपराधांचा प्रतिबंध व तपास, आणि शास्ति**

४४. प्रवेश करणे, झडती घेणे, अटक करणे व स्थानबद्ध करणे याबाबत अधिकार . . . . . .

४५. शास्ती . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

४५-क. अन्याय्य जप्तीसाठी शिक्षा . . . . . . . . . . . . . . . . . . . .

४५-ख. अपराध आपसात मिटवण्याचा अधिकार . . . . . . . . . . . . . . . .

४६. न्यायालयाने अपराधाची दखल केव्हा घ्यावी . . . . . . . . . . . . . .

४७. इतर विधींच्या प्रवर्तनास प्रतिबंध नसणे . . . . . . . . . . . . . . . .

प्रकरण सात

**संकीर्ण**

४८. नियम बनविण्याचे अधिकार . . . . . . . . . . . . . . . . . . . .

४९. अनुसूचींमध्ये सुधारणा करण्याचे अधिकार . . . . . . . . . . . . . .

५०. जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण . . . . . . . . . . . . . . . . . .

५१. वन्य प्राणि अधिकारी लोकसेवक असणे . . . . . . . . . . . . . . . .

५२. सद्भावनापूर्वक कृति करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण . . . . . . . . . . . . . .

५३. सूट देण्याचा अधिकार . . . . . . . . . . . . . . . . . . . .

५३-क. अनुसूचींमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार . . . . . . . . . . . . . .

५४. निरसन . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

५५. आणखी निरसन व व्यावृत्ति . . . . . . . . . . . . . . . . . . . .

अनुसूची एक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

अनुसूची दोन . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

अनुसूची तीन . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

अनुसूची चार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

# [सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४][१]

## [ मुंबई वन्य जनावरे आणि वन्य पक्षी संरक्षण अधिनियम, १९५१] *

[२४ जुलै, १९५१]

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६, अन्वये अनुकूलन व सुधारणा केलेला.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अन्वये अनुकूलन व सुधारणा केलेला.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११ अन्वये सुधारणा केलेला.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम २ अन्वये सुधारणा केलेला.

सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३ अन्वये सुधारणा केलेला.

## मुंबई राज्यामध्ये वन्य जनावरे व पक्षी यांच्या संरक्षणासाठी पुरेशी तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यातील वन्य जनावरे आणि वन्य पक्षी यांचे जतन व संरक्षण करण्यासाठी आणि यापुढे येणाऱ्या काही विशिष्ट बाबींसाठी अधिक चांगली व पुरेशी तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** याद्वारा खालीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:—

### प्रकरण एक

### प्रारंभिक.

१. (१) या अधिनियमास मुंबई वन्य जनावरे आणि वन्य पक्षी संरक्षण अधिनियम, १९५१, असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

[२][ (२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.]

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा नेमील त्या [३][दिनांकाला] [४][पुनर्रचनापूर्व मुंबई राज्यामध्ये] अंमलात येईल, [५][आणि मुंबई वन्य जनावरे आणि वन्य पक्षी संरक्षण (विस्तार व सुधारणा) अधिनियम, १९६०, याचा [६][प्रारंभ] झाल्यानंतर, तो महाराष्ट्र राज्याच्या उर्वरित भागांमध्ये अंमलात येईल].

---

*हा अधिनियम महाराष्ट्र राज्याच्या शेष भागास लागू करण्यात आला व याप्रकारे लागू केल्यामुळे तो अशा भागात अंमलात राहील.

(सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम २ पहा.).

[१]उद्दिष्ट व कारणे यांच्या निवेदनासाठी, **मुंबई शासन राजपत्र** १९५१, भाग पाच, पृष्ठ १४ पहा.

[२]पोट कलम (२) हे, सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ३ (अ) अन्वये मूळ पोट कलमाच्या जागी घालण्यात आले.

[३]१ मे १९५३ (शासकीय अधिसूचना, कृषि व वन विभाग, क्र. ५९९१/जे, दिनांक ७ एप्रिल १९५३ पहा.)

[४] हा मजकूर सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ३ (ब) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

[५] हा भाग १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ३ (ब) अन्वये दाखल करण्यात आला.

[६] १ जून १९६१ (शासकीय अधिसूचना, कृषि व वन विभाग, क्र. डब्ल्यूएलपी १०५६/१२४१२ई, दिनांक २५ मे १९६१ पहा.)

व्याख्या. **२.** विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसल्यास, या अधिनियमात,—

(क) "जनावरे किंवा पक्षी" यामध्ये, यथास्थिति, जनावर किंवा पक्षी यांच्या पिलांचा समावेश होईल ;

(ख) "मोठे श्वापद" याचा अर्थ, अनुसूची तीन किंवा चार मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही जनावर असा होईल;

(ग) "श्वापद" याचा अर्थ, अनुसूची दोन, तीन किंवा चार यामध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही जनावर किंवा पक्षी असा होईल;

(घ) "वन्य प्राणि अधिकारी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी नियुक्त केलेला रक्षक किंवा प्राधिकृत असा कोणताही अधिकारी, रक्षक किंवा सेवक असा होईल;

(ङ) "शिकार करणे" याचा अर्थ, कोणत्याही पध्दतीने कोणत्याही जनावराची किंवा पक्ष्याची शिकार करणे, त्याला ठार मारणे किंवा पकडणे असा होईल व या संज्ञेत त्याला ठार मारणे किंवा पकडणे किंवा त्याच्या शरीराचा कोणताही भाग, किंवा त्याची अंडी किंवा घरटे घेणे किंवा ती नष्ट करणे किंवा त्याची अंडी किंवा घरटे उध्वस्त करणे, यासाठी केल्या जाणाऱ्या प्रत्येक प्रयत्नाचा समावेश असेल ;

(च) "अनुज्ञप्ति" याचा अर्थ, या अधिनियमान्वये दिलेली अनुज्ञप्ति असा होईल ;

(छ) "मांस" यात चरबी, रक्त, मांस व हाडे यांचा समावेश असेल ;

(ज) "परवाना" याचा अर्थ, या अधिनियमान्वये दिलेला परवाना, असा होईल;

(झ) "विहित" याचा अर्थ, नियमानुसार विहित केलेले असा होईल;

(ञ) "नियम" याचा अर्थ, कलम ४८ अन्वये तयार केलेले नियम, असा होईल;

(ट) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा होईल;

(ठ) "लहान श्वापद" या संज्ञेचा अर्थ, अनुसूची दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही जनावर किंवा पक्षी, असा होईल;

(ड) "मृगयाचिन्ह" (ट्रॉफी) या संज्ञेचा अर्थ, एखाद्या जनावराचा किंवा पक्ष्याचा नैसर्गिक किंवा कृत्रिम यासारख्या कोणत्याही उपायांनी जतन करून ठेवलेला टिकाऊ भाग असा होईल ; आणि यात कोणत्याही जनावराचे किंवा पक्ष्याचे डोके किंवा शिंग, दात, सुळा, हाड, पंजा, खूर, कातडे, केस, पीस, अंडी किंवा घरटे यांचा समावेश असेल ; परंतु यात, जनावराच्या किंवा पक्ष्याच्या वर सांगितलेल्या अशा कोणत्याही भागापासून तयार केलेल्या कोणत्याही वस्तूचा समावेश असणार नाही.

(ढ) "उपद्रवकारक प्राणी" या संज्ञेचा अर्थ, अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही जनावर किंवा पक्षी असा असून त्यात कलम १८ अन्वये उपद्रवकारक प्राणी म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही जनावराचा किंवा पक्ष्याचा समावेश होईल;

पाळीव व बंदिस्त असलेली इतर जनावरे व पक्षी यांना सूट. **३.** या अधिनियमातील कोणताही मजकूर, पाळीव किंवा वैधरीतीने पकडून बंदिस्त करून ठेवलेल्या इतर जनावरांना किंवा पक्ष्यांना लागू होणार नाही.

## प्रकरण दोन

**अधिनियमाखाली नियुक्त करावयाचे प्राधिकारी किंवा प्रस्थापित केले जाणारे प्राधिकरण.**

वन्य प्राणिरक्षा अधिकारी, वन्य प्राणि रक्षक व इतर वन्य प्राणि अधिकारी यांची नियुक्ती.

**४.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी खालील प्राधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल.–

[1][ (क) मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, यांना महाराष्ट्र राज्याचा वन्य प्राणि रक्षा अधिकारी म्हणून ;]

(ख) एकतर मानसेवी किंवा वृत्तिधारी वन्य प्राणि रक्षक ;

(ग) आवश्यक असतील त्याप्रमाणे इतर अधिकारी व सेवक.

(२) मानसेवी वन्य प्राणि रक्षक सर्वसाधारणपणे तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील :

परंतु, राज्य शासनास, त्याचा पदावधि कोणत्याही वेळी, कोणतेही कारण न देता समाप्त करता येईल.

(३) या कलमाखाली नियुक्त करण्यात आलेले वन्य प्राणि रक्षक आणि इतर अधिकारी व सेवक हे वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याच्या हाताखाली असतील.

वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याने अधिकाराचे प्रत्यायोजन करणे.

**५.** वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याला, राज्य शासनाच्या मान्यतेने, लेखी आदेशाद्वारे अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी कोणतीही शर्त असल्यास,अशा शर्तीच्या अधीन, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधानुसार [2][ राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास ] आपले कोणतेही अधिकार व कर्तव्ये प्रत्यायोजित करता येतील.

राज्य वन्य प्राणि सल्लागार मंडळाची रचना.

**६.** [3][ (१) राज्य शासन, मुंबई वन्य जनावरे आणि वन्य पक्षी (सुधारणा) अधिनियम, १९६३, अंमलात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, ज्याला यापुढे "राज्य वन्य प्राणि सल्लागार मंडळ" असे संबोधण्यात आले आहे अशा सल्लागार मंडळाची पुनर्रचना करील आणि त्यात पदसिध्द अध्यक्ष म्हणून वनमंत्री, पदसिध्द उपाध्यक्ष म्हणून वन उपमंत्री आणि राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले तेरा सदस्य यांचा समावेश असेल.]

(२) वन्य प्राणिरक्षा अधिकारी हा मंडळाचा सचिव राहील.

(३) सदस्य हे, पदावधि व पद सोडणे याबाबतीत राज्य शासन निश्चित करील अशा अटींवर सामान्यपणे पद धारण करतील ;

परंतु, राज्य शासनास, कोणत्याही सदस्याचा पदावधि, कोणत्याही वेळी, कोणतेही कारण न देता समाप्त करता येईल.

(४) सदस्य, आपली कर्तव्ये पार पाडीत असता यथोचितरीत्या आलेल्या खर्चाच्या बाबतीत राज्य शासन ठरवील असे भत्ते मिळण्यास हक्कदार असतील :

---

[1]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ४ अन्वये मूळ खंडाच्या जागी खंड (अ) घालण्यात आले.

[2]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम २ अन्वये "आपल्या हाताखाली कोणत्याही अधिकाऱ्यांकडे" या मजकुराच्या जागी सदरहू मजकूर घालण्यात आला.

[3]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम २, कलम २ (अ) अन्वये पोट-कलम (१) घालण्यात आले.

[१][ परंतु, राज्य विधानमंडळाच्या एखाद्या सदस्याला मंडळाचा सदस्य म्हणून नामनिर्देशित केले असेल तर, तो मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहताना किंवा अशा सदस्याच्या नात्याने इतर कोणतेही काम पार पाडीत असताना झालेला वैयक्तिक खर्च भागविण्यासाठी मंडळाच्या सदस्यास देण्यात येणारा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा असा इतर भत्ता याव्यतिरिक्त इतर कोणतेही पारिश्रमिक मिळण्यास हक्कदार असणार नाही.]

राज्य वन्य प्राणि सल्लागार मंडळाची कर्तव्यं.

७. राज्य शासनाला खालील बाबींवर सल्ला देणे हे राज्य वन्य प्राणि सल्लागार मंडळाचे कर्तव्य असेल--

(१) श्वापदांची अभयारण्ये म्हणून जाहीर करावयाच्या क्षेत्रांची निवड करणे ;

(२) या अधिनियमाखाली अनुज्ञप्ति व परवाने देण्यासाठी धोरण ठरवणे व श्वापदांच्या अभयारण्यांचा कारभार पाहणे ;

(३) कलम ४८ अन्वये नियम तयार करणे ; आणि

(४) राज्य शासन, या मंडळाकडे निर्देशित करील अशी जनावराचे व पक्ष्याचे जतन व संरक्षण यांच्याशीं संबंधित इतर कोणतीही बाब.

राज्य वन्य प्राणि सल्लागार मंडळाची कार्यपद्धती.

८. (१) राज्य वन्य प्राणि सल्लागार मंडळाची सभा मुंबई येथे किंवा राज्य शासन निदेश देईल अशा इतर ठिकाणी कमीत कमी वर्षातून एकदा घेण्यात येईल.

(२) मंडळाची कार्यपध्दती (गणपूर्तीची कार्यपध्दती धरुन) याबाबतीत केलेल्या उपविधींच्या अन्वये मंडळ ठरवील त्याप्रमाणे असेल.

---

## प्रकरण तीन

### जनावरांची व पक्ष्यांची शिकार करणे.

### क-अनुज्ञप्ति

वन्य जनावर व पक्षी यांची अनुज्ञप्ती शिवाय शिकार करण्यास मनाई.

९. कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या उपबंधान्वये दिलेल्या अनुज्ञप्तीनुसार व अशा अनुज्ञप्तीमध्ये केलेल्या विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीनुसार असेल त्या खेरीज, कोणतेही वन्य जनावर किंवा वन्य पक्षी यांची शिकार करणार नाही :

परंतु, कोणत्याही उपद्रवकारक प्राण्याची शिकार करण्यासाठी अशी कोणतीही अनुज्ञप्ती आवश्यक असणार नाही.

शस्त्रे बाळगणाऱ्या विवक्षित व्यक्तींची नोंदणी करणे.

१०. शिकारीसाठी किंवा संरक्षणासठी शस्त्रे बाळगण्यासाठी [२][ शस्त्रात्रे अधिनियम, १९[illegible]] अन्वये दिलेली अनुज्ञप्ति धारण करणारी किंवा या अधिनियमाच्या उपबंधांतून सूट मिळालेली व कोणतीही शस्त्रे बाळगणारी [३][आणि या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या (पक्ष्यांच्या शिकारीच्या अनुज्ञप्तीव्यतिरिक्त इतर) कोणतीही अनुज्ञप्ति मिळविण्याची इच्छा असलेली ] कोणतीही व्यक्ती, वन्य प्राणि रक्षा अधिकाऱ्याकडे किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे आपले नाव व पत्ता, नोंदवील. अशी नोंदणी, विहित नमुन्यामधून अर्ज केल्यादर आणि विहित करण्यात येईल अशी फी भरल्यावर, करण्यात येईल.

---

[१] हे परंतुक, सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम २, कलम २ (ब) अन्वये घालण्यात आले.

[२] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ३ (अ) द्वारे "भारतीय शस्त्रास्त्रे अधिनियम, १८७८," या मजकुराच्या जागी सदरहू मजकूर घालण्यात आला.

[३] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ३ (ब) अन्वये सदरहू मजकूर समाविष्ट केला.

**११.** (१) शिकारीची अनुज्ञप्ती मिळविण्याची इच्छा असेलेली कोणतीही व्यक्ती, वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाने याबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यामध्ये अर्ज करील. अशा अर्जासोबत, विहित करण्यात येईल अशी अनुज्ञप्तीची फी भरण्यात येईल. वन्य अनुज्ञप्ति मिळविण्याची कार्यपध्दती.

(२) खालीलपैकी कोणत्याही किंवा सर्व प्रकारच्या शिकारीच्या अनुज्ञप्तींसाठी अर्ज करता येईल :—

(क) लहान श्वापदाच्या शिकारीची अनुज्ञप्ति,

(ख) मोठ्या श्वापदाच्या शिकारीची अनुज्ञप्ति,

(ग) विशेष मोठ्या श्वापदाच्या शिकारीची अनुज्ञप्ति,

(घ) पाळीव जनावरांसाठी (बाळगण्याबाबत) अनुज्ञप्ति,

(ङ) पाळीव व इतर जनावरांसाठी (सापळ्यात पकडण्याबाबत) अनुज्ञप्ति,

[१][(च) पक्ष्यांसाठी अनुज्ञप्ति.

(छ) वनखंडातील (ब्लॉक) शिकारींची अनुज्ञप्ति.]

(३) वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्यास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास, अर्ज मिळाल्यानंतर व त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीन, शिकारीची अनुज्ञप्ति देता येईल किंवा [२][नाकारण्याबाबतच्या आपल्या कारणांची लेखी नोंद केल्यानंतर] अशी अनुज्ञप्ति देण्याचे नाकारता येईल. शिकारीची अनुज्ञप्ति नाकरण्यात येईल तेव्हा, त्यासाठी भरण्यात आलेली फी अर्जदारास परत करण्यात येईल.

(४) या कलमानुसार देण्यात आलेली शिकारीची प्रत्येक अनुज्ञप्ति, विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी [३][व अशा क्षेत्रामध्ये] सर्वसाधारणपणे वैध राहील.

[४] [* * * * * * * *]

**१२.** (१) कलम ११, पोट-कलम (२) च्या [५][खंड (अ)] (ब) (क) [६][(ई) किंवा (ग)] मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या प्रत्येक शिकारीची अनुज्ञप्ति धारण करणारी व्यक्ती, तिची अनुज्ञप्ति चालू असण्याच्या मुदतीत तिने ठार केलेल्या किंवा पकडलेल्या सर्व श्वापदांचा विहित करण्यात येईल असा तपशील असलेला अभिलेख ठेवील. शिकार केलेल्या श्वापदासंबंधी अभिलेख ठेवणे व सादर करणे.

---

[१] (च) व (छ) या नोंदी, सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ४ (अ), अन्वये जादा दाखल करण्यात आल्या.

[२] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ६ (अ) अन्वये " कोणतीही कारणे न देता " या मजकुराच्या जागी सदरहू मजकूर घालण्यात आला.

[३] हा मजकुर सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ४ (ब) अन्वये दाखल करण्यात आला.

[४] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ६ (ब) अन्वये पोट-कलम (५) वगळण्यात आले.

[५] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ७ (अ), अन्वये सदरहू मजकूर घालण्यात आला.

[६] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ५ (अ) अन्वये, " किंवा (इ) " या मजकुराच्या जागी सदरहू मजकूर दाखल करण्यात आला.

(२) जेव्हा [1][ मोठ्या श्वापदाच्या शिकारीची अनुज्ञप्ति, विशेष मोठ्या श्वापदाच्या शिकारीची अनुज्ञप्ति किंवा वनखंडातील शिकारीची अनुज्ञप्ति ] धारण करणाऱ्याने कोणत्याही श्वापदास ठार मारले असेल किंवा पकडले असेल तेव्हा तो अशा श्वापदास ठार मारण्याच्या किंवा पकडण्याच्या दिवसापासून [1][ तीन दिवसाच्या आत] किंवा [2][ महाराष्ट्र राज्य ] सोडून जाण्यापूर्वी, यापैकी जो अगोदरचा असेल त्या कालावधीत त्याने ठार मारलेल्या किंवा पकडलेल्या [3][ मोठ्या श्वापदांसंबंधीची किंवा विशेष मोठ्या श्वापदासंबंधीचा ] विहित तपशील वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याला किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याला लेखी कळवील.

(३) अनुज्ञप्तिधारक, त्याच्या अनुज्ञप्तिचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, पंधरा दिवसांच्या आत आपली अनुज्ञप्ति वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याला परत करील आणि त्याने ठार मारलेल्या किंवा पकडलेल्या श्वापदासंबंधीच्या अभिलेखाची अचूकता प्रमाणित करणाऱ्या विहित नमुन्यातील प्रतिज्ञापनावर सही करील.

**विशेष प्रयोजनासाठी अनुज्ञप्ति देणे.**

**१३.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, वन्य प्राणिरक्षा अधिकारी, [4][किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी ] याने, त्यास लादण्यास योग्य वाटतील अशा शर्तीवर कोणत्याही व्यक्तीला फी दिल्यानंतर किंवा फी दिल्याशिवाय अनुज्ञप्ति देणे हे विधिसंमत असेल आणि त्यामुळे अनुज्ञप्तिधारकास, अनुज्ञप्तिवर विनिर्दिष्ट असलेली जनावरे आणि पक्षी यांची खालीलपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी शिकार करण्याचा हक्क प्राप्त होईल :—

(एक) वैज्ञानिक संशोधन ;

(दोन) प्राणी संग्रहालये, संग्रहालये व सदृश संस्था यांच्यासाठी नमुने गोळा करणे; आणि

(तीन) मानवी जीवन किंवा मालमत्ता यांना ज्यांपासून गंभीर धोका निर्माण झाला असेल अशी जनावरे व पक्षी ठार मारणे.

[5][ राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीन, वन्य प्राणिरक्षा अधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी याने मानवी जीवन किंवा मालमत्ता यास ज्यापासून गंभीर धोका निर्माण झाला असेल अशा कोणत्याही जनांवरास किंवा पक्ष्यांस ठार मारण्यासाठी आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार कोणत्याही व्यक्तिला बक्षीस देणे, हे देखील विधिसंमत असेल.]

**अनुज्ञप्ति तहकूब किंवा रद्द करणे.**

**१४.** (१) वन प्राणिरक्षा अधिकारी किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, याला, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीन, कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय, [6][परंतु, त्याबाबत आपल्या कारणांची लेखी नोंद केल्यानंतर] , या प्रकरणान्वये देण्यात आलेली कोणतीही अनुज्ञप्ति तहकूब किंवा रद्द करता येईल.

---

[1]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ५ ब (एक) अन्वये ''असा लैसेन्स. . . . पंधरा दिवसापेक्षा उशिरा नाही अशा वेळाने'' या मजकुराऐवजी, सदरहू मजकूर दाखल करण्यात आला.

[2]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ७ ब, याअन्वये ''महाराष्ट्र राज्याचे मुंबई क्षेत्र'' या मजकुराच्या जागी सदरहू-मजकूर दाखल करण्यात आला.

[3]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ५ (ब) (दोन) या अन्वये ''जनावरासंबंधीचा किंवा पक्ष्यासंबंधीचा'' या मजकुराच्या जागी सदरहू मजकूर दाखल करण्यात आला.

[4]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ६ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ६(ब) अन्वये हा मजकूर जादा समाविष्ट करण्यात आला.

[6]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ८ (अ) अन्वये, ''आणि कोणतीही कारणे न देता'' या मजकुराच्या जागी सदरहू-मजकूर दाखल करण्यात आला.

[1][(२) कोणत्याही अनुज्ञप्तिधारकाला, अनुज्ञप्ति तहकूब किंवा रद्द झाल्यामुळे कोणतीही नुकसानभरपाई मिळण्याचा किंवा त्यासंबंधात भरण्यात आलेल्या कोणत्याही फीचा परतावा मिळण्याचा हक्क असणार नाही.]

[2][(१४-क) (१) कलम ११ च्या पोट-कलम (३) अन्वये अनुज्ञप्ति देण्याचे नाकारणाऱ्या आदेशावर किंवा कलम १४ च्या पोट-कलम (१) अन्वये अनुज्ञप्ति तहकूब किंवा रद्द करणाऱ्या आदेशावर,—

(क) जर असा आदेश कलम ११ किंवा कलम १४ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने केला असेल तर, वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याकडे ; आणि

(ख) असा आदेश वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याने केला असेल तर, राज्य शासनाकडे, अपील करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये, वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याने अपिलावर दिलेल्या आदेशाच्या बाबतीत, राज्य शासनाकडे दुसरे अपील करता येईल.

(३) पूर्वोक्त पोटकलमांच्या अधीन, या कलमानुसार अपिलावर देण्यात आलेल्या प्रत्येक आदेश हा अंतिम राहील.

(४) ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल असा आदेश संसूचित केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत अपील दाखल केले नसेल तर कोणतेही अपील विचारात घेतले जाणार नाही :—

परंतु, अपीलदाराने, नियुक्त कालमर्यादेत अपील दाखल न करण्यासाठी आपल्याला पुरेसे कारण होते याविषयी अपील प्राधिकाऱ्याचे समाधान केले तर, अशा प्राधिकाऱ्यास पूर्वोक्त कालावधी संपल्यानंतर कोणतेही अपील दाखल करून घेता येईल.]

## ख–सर्वसाधारण

**१५.** (१) कोणतीही व्यक्ती, अनुज्ञप्तीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीनुसार येथील अर्थाला अनुलक्षून प्राधिकृत केले असेल त्या व्यतिरिक्त, कोणत्याही श्वापदाचे पिलू किंवा आपल्या पिलासोबत असलेली कोणतीही मादी किंवा शिंगे न उगवलेले कोणतेही हरिण यांची शिकार करणार नाही : पिलाची व पिलासोबत असलेल्या मादीची शिकार करण्यास मनाई.

[3][परंतु लागवडीखालील कोणत्याही क्षेत्रामध्ये, अशा लागवडीला धोका निर्माण करणाऱ्या वनस्पतिभक्षक मादीपैकी कोणत्याही वर्गातील मादीची वन्य प्राणिरक्षा अधिकारी किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्रधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी यांनी दिलेल्या विशेष परवानगीनुसार शिकार करण्याची परवानगी देता येईल.]

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेला कोणताही मजकूर, उपद्रवकारक प्राण्याच्या शिकारीस लागू होणार नाही.

**१६.** राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारा, संपूर्ण [4][महाराष्ट्र राज्यात] किंवा त्याच्या कोणत्याही भागात, कोणत्याही प्रकारचे वन्य जनावर किंवा पक्षी किंवा अशा प्रकारची मादी किंवा असे अपूर्ण वाढीचे वन्य जनावर किंवा पक्षी यांच्या बाबतीत संपूर्ण वर्ष किंवा त्याचा काही भाग, शिकारबंदीचा कालावधी म्हणून जाहीर करता येईल. शिकार बंदीचा कालावधी.

---

[1]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ७ अन्वये पोट-कलम (२) जादा घालण्यात आले.

[2]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम ९ अन्वये कलम १४-अ समाविष्ट करण्यात आले.

[3]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ८ द्वारा हे परंतुक जादा समाविष्ट करण्यात आले.

[4]सन १९६१ चा मुंबई अधिनियम ११, कलम १० अन्वये, "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात" या मजकुरांच्या जागी उपरोक्त मजकूर घालण्यात आला.

शिकारीची बेकायदेशीर पद्धती.

**१७.** (१) [1][पोट-कलम (१०) च्या उपबंधांच्या अधीन, कोणतीही व्यक्ती,] पाण्यावरुन किंवा जमिनीवरुन चाकांद्वारे किंवा यंत्राद्वारे चालणाऱ्या एखाद्या वाहनातून किंवा त्याच्या सहाय्याने किंवा विमानातून कोणत्याही श श्वापदाची शिकार करणार नाही.

(२) [1][पोट-कलम (१०) च्या उपबंधांच्या अधीन, कोणतीही व्यक्ती,] श्वापदास ठार मारणे, हुसकावणे किंवा उधळून लावणे यासाठी मोटारीचा, मोटार लाँचचा किंवा विमानाचा वापर करणार नाही.

(३) कोणतीही व्यक्ती, मानवी जीवन व मालमत्ता यांच्या संरक्षणाव्यतिरिक्त आणि कलम ११, पोट-कलम (२), खंड (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनुज्ञप्ती अन्वये जनावरे व पक्षी यांना पकडण्याच्या बाबतीत जेथपर्यंत शिकारीचा संबंध पोचत असेल त्याखेरीज करून जाळी, पाश, चोरखड्डे, विष किंवा विषारी शस्त्रे यांच्या सहाय्याने श्वासपदाची शिकार करणार नाही.

(४) कोणतीही व्यक्ती, शिकारीच्या प्रयोजनासाठी कोणत्याही झाडझुडूपांना आग लावणार नाही.

(५) कोणतीही व्यक्ती, मांसभक्षक जनावराच्या बाबतीत खेरीजकरून, शिकारीच्या प्रयोजनासाठी, [2]*गाऱ्यावर कोणत्याही कृत्रिम प्रकाशाचा उपयोग करणार नाही.

(६) कोणतीही व्यक्ती, मांसभक्षक जनावराच्या बाबतीत खेरीजकरून रात्रीच्या वेळी, म्हणजेच सूर्यास्तानंतर एक तास व सूर्योदयापूर्वी एक तास, या दरम्यान, [2]*गाऱ्यावर बसून कोणत्याही श्वापदाची शिकार करणार नाही.

(७) कोणतीही व्यक्ती, जनावरांची क्षारयुक्त माती चाटण्याची जागा, पाणवटा किंवा पाणी पिण्याच्या इतर जागा किंवा त्याकडे जाणाऱ्या वाटा व पोचमार्ग यावर पाणकबुतर (सँडग्राऊज) आणि पाणपक्षी (वॉटरबर्ड) याव्यतिरिक्त कोणत्याही श्वापदाची शिकार करणार नाही.

(८) कोणतीही व्यक्ती, खाजगी मालकीच्या कोणत्याही जमिनीवर, तिच्या मालकाची किंवा त्याच्या अभिकर्त्याची किंवा अशा जमिनीच्या वैध भोगवटादाराची संमती असल्याशिवाय, कोणत्याही श्वापदाची शिकार करणार नाही.

(९) कोणतीही व्यक्ती, शिकारीच्या प्रयोजनासाठी शिकारीची अनुज्ञप्ति धारण करीत असली तरीही, शिकारबंदीच्या कालावधीत कोणत्याही श्वापदाची शिकार करणार नाही.

[3][(१०) या कलमामधील कोणताही मजकूर, बाह्य इंजिनाच्या (आऊटबोर्ड मोटार) नावेचा उपयोग करून बदकाची शिकार करण्यास लागू होणार नाही.]

विवक्षित जनावरे व पक्षी, उपद्रवकारक प्राणि म्हणून जाहीर करणे.

**१८.** राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारा, अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वन्य जनावरांच्या किंवा वन्य पक्ष्यांच्या खेरीज इतर कोणत्याही वन्य जनावरास किंवा वन्य पक्ष्यास कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रामध्ये उपद्रवकारक प्राणी म्हणून जाहीर करता येईल, आणि अशा क्षेत्रामध्ये अशा कोणत्याही जनावरांची किंवा पक्ष्यांची शिकार करण्यासाठी अनुज्ञप्ति धारण करण्याची आवश्यकता असणार नाही.

---

[1]सन १९६१ चा, मुंबई अधिनियम ११, कलम (अ) अन्वये, "कोणत्याही इसमाने" या मजकुराच्या जागी, सदरहू मजकूर घालण्यात आला.

[2]*सन १९६१ चा मुंबई अधिनियम ११, कलम ११ (ब) अन्वये "नैसर्गिक" हा शब्द वगळण्यात आला.

[3]सन १९६१ चा, मुंबई अधिनियम ११, कलम ११ (क) अन्वये पोट-कलम (१०) जादा दाखल करण्यात आले.

[१][१८क. कलम ३६ व ३७ चे उपबंध, ते मृगयाचिन्हांच्या बाबतीत लागू होतात याचप्रमाणे श्वापदाच्या बाबतीत लागू होतील.] श्वापदांस कलम ३६ व ३७ लागू असणे.

---

प्रकरण चार

## श्वापदांची अभयारण्ये

**१९.** राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा, या पुढे दिलेल्या पद्धतीने, कोणतेही क्षेत्र श्वापदांचे अभयारण्य म्हणून जाहीर करता येईल. कोणतेही क्षेत्र श्वापदांचे अभयारण्य म्हणून जाहीर करण्याच अधिकार.

**२०.** जेव्हा कोणतेही क्षेत्र श्वापदांचे अभयारण्य म्हणून जाहीर करण्याचे ठरविण्यात येते, तेव्हा राज्य शासन, **शासकीय राजपत्रामध्ये**,— श्वापदांचे अभयारण्या जाहीर करण्यासंबंधी अधिसूचना.

(१) असे क्षेत्र श्वापदांचे अभयारण्य म्हणून जाहीर करण्याचे ठरविण्यात आले आहे, असे नमूद करणारी ;

(२) जास्तीत जास्त शक्य होईल तितपत, अशा क्षेत्राची जागा व सीमा यांचा निर्देश करणारी, आणि

(३) अशा क्षेत्राच्या सीमांमध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीमध्ये किंवा जमिनीवरील कोणत्याही व्यक्तींच्या नावाने अस्तित्वात असल्याचे अभिकथित करण्यात आले अशा कोणत्याही अधिकाराचे अस्तित्व, स्वरूप व व्याप्ति यांची चौकशी करण्यासाठी व ते निर्धारित करण्यासाठी आणि या अधिनियमामध्ये उपबंधित केल्याप्रमाणे त्यासंबंधात कार्यवाही करण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्यास निदेश देणारी,

एक अधिसूचना प्रसिद्ध करील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी रस्ते, नद्या, उभारलेले दांडे यांच्या सहाय्याने किंवा इतर सर्वपरिचित किंवा सहजगम्य होणाऱ्या सीमांद्वारे या क्षेत्राचे वर्णन करणे पुरेसे होईल.

**२१.** कलम २० अन्वये अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर, उत्तराधिकाराने असेल त्याखेरीज अशा अधिसूचनेमध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीबाबत किंवा जमिनीवर कोणताही अधिकार संपादन करता येणार नाही. श्वापदांच्या अभयारण्यात समाविष्ट असलेल्या जमिनीबाबत कोणतेही अधिकार संपादित करण्यास प्रतिबंध

---

[१] सन १९६१ चा मुंबई अधिनियम ११, कलम १२ अन्वये कलम १८-क समाविष्ट करण्यात आले.

जिल्हाधिकाऱ्याची उद्घोषणा

२२. कलम २० अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यास आली असेल तेव्हा, जिल्हाधिकारी, तीत समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या शेजारच्या प्रत्येक गावामध्ये व खेड्यामध्ये प्रादेशिक भाषेत—

(क) प्रस्तावित श्वापदांच्या अभयारण्याची जागा व सीमा यांचा जास्तीत जास्त शक्य होईल तितपत, निर्देश करणारी ;

(ख) उद्घोषणेच्या तारखेपासून दोन महिन्यांपेक्षा कमी नाही एवढा कालावधी निश्चित करणारी आणि कलम २० किंवा कलम २१ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अधिकाराबाबत दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अशा कालावधीमध्ये, जिल्हाधिकाऱ्यास, एकतर अशा अधिकाराचे स्वरूप व त्याच्यासंबंधात मागणी केलेली नुकसानभरपाईची (असल्यास) रक्कम व तिचा तपशील यांचा निर्देश करणारी एक लेखी नोटीस सादर करण्यास किंवा त्याच्यापुढे उपस्थित होऊन त्याजबाबत सांगण्यास भाग पाडणारी;

एक उद्घोषणा प्रसिध्द करील.

जिल्हाधिकाऱ्याकडून चौकशी.

२३. जिल्हाधिकारी, कलम २२ अन्वये केलेल्या सर्व निवेदनाची लिखित नोंद घेईल आणि त्या कलमान्वये यथोचितरित्या निर्देशित केलेले सर्व दावे आणि कलम २० किंवा २१ मध्ये नमूद केलेल्या परंतु त्या सरकारी अभिलेखावरून निश्चित माहिती मिळवण्याजोगे असतील तेथवर, कलम २२ नुसार दावा न सांगितलेल्या अशा कोणत्याही अधिकारांचे अस्तित्व व त्याबाबत माहितगार असण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही व्यक्तींची साक्ष, यांची एखाद्या सोईस्कर जागी चौकशी करील.

अधिकार विलोप.

२४. कलम २२ अन्वये ज्या अधिकाराच्या संबंधात कोणताही दावा सांगण्यात आला नसेल आणि ज्याच्या अस्तित्वासंबंधी कलम २३ अन्वये केलेल्या चौकशीद्वारा कोणतीही माहिती मिळाली नसेल, असे अधिकार नष्ट होतील.

ज्या जमिनीवर अधिकार सांगितला असेल अशी जमीन संपादन करण्याचा अधिकार.

२५. कोणत्याही जमिनीतील किंवा जमिनीवरील सार्वजनिक रस्त्याचा अधिकार किंवा समाईक चराईचा अधिकार याव्यतिरिक्त इतर अधिकाराबाबत दावा सांगितला असेल अशा बाबतीत, जिल्हाधिकारी, एकतर,—

(क) अशी जमीन, प्रस्तावित श्वापदांच्या अभयारण्याच्या सीमेतून वगळील, किंवा ;

(ख) तिच्या मालकाबरोबर, त्याचे अधिकार सोडून देण्याबाबत करार करील, किंवा

(ग) जमीन संपादन करण्याविषयी अधिनियम, १८९४, यांत उपबंधित केलेल्या पध्दतीने अशी जमीन संपादन करण्यासाठी कार्यवाही करील.

जमीन संपादनाची कार्यवाही.

२६. अशी जमीन संपादन करण्याच्या प्रयोजनासाठी—

(१) जिल्हाधिकाऱ्याला, जमीन संपादनाविषयी अधिनियम, १९८४, याअन्वये कार्यवाही करणारा जिल्हाधिकारी, असे समजण्यात येईल.

(२) दावा सांगणारी व्यक्ती, ती हितसंबंध असलेली आणि उक्त अधिनियमाच्या कलम ९ अन्वये दिलेल्या नोटीशीनुसार जिल्हाधिकाऱ्यापुढे उपस्थित राहणारी व्यक्ती समजण्यात येईल ;

(३) उक्त अधिनियमाच्या पूर्ववर्ती कलमांच्या उपबंधांचे अनुपालन करण्यात आले आहे असे समजण्यात येईल ;

(४) जिल्हाधिकाऱ्यास, दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या संमतीने किंवा न्यायालयास या दोन्ही पक्षांच्या संमतीने, जमिनीच्या स्वरूपात किंवा अंशतः जमिनीच्या व अंशतः पैशाच्या स्वरूपात नुकसानभरपाई देता येईल ; आणि

(५) सार्वजनिक रस्ता किंवा समाईक कुरण बंद करण्यात आल्यास त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, व्यवहार्य व सोईस्कर होईल तितपत, पर्यायी सार्वजनिक रस्ता किंवा समाईक कुरण यांची तरतूद करता येईल.

२७. राज्य शासनास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कलम २० ते २६ (दोन्ही धरून) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने वापरावयाचे अधिकार किंवा पार पाडावयाची कामे, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याला वापरता येतील व पार पाडता येतील, असा निदेश देता येईल. जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकाराचा वापर इतर अधिकाऱ्यांनी करणे.

२८(क). कामावर असलेला कोणताही लोकसेवक; श्वापदांच्या अभयारण्यात प्रवेश करण्यावर निर्बंध.

(ख) सामान्यपणे अभयारण्याच्या सीमांतर्गत राहणारी कोणतीही व्यक्ती ;

(ग) अभयारण्याच्या सीमेमधील स्थावर मालमत्तेवर कोणताही अधिकार असलेली कोणतीही व्यक्ती ;

(घ) अभयारण्यामधून सार्वजनिक महामार्गाने जात असलेली कोणतीही व्यक्ती ;

(ड.) वरील व्यक्तीचे अवलंबित व सेवक ;

याच्याशिवाय, कोणतीही व्यक्ती, परवान्याखेरीज आणि कलम २९ अन्वये देण्यात आलेल्या परवान्याच्या शर्तींनुसार असेल त्या खेरीज, श्वापदांच्या अभयारण्यात प्रवेश करणार नाही किंवा राहणार नाही.

२९. (१) वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्यास, अर्ज केल्यावर कोणत्याही व्यक्तीला, खालीलपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी श्वापदांच्या अभयारण्यात प्रवेश करण्यासाठी किंवा राहण्यासाठी परवाना देता येईल :— श्वापदांच्या अभयारण्यात प्रवेश करण्यासाठी किंवा राहण्यासाठी परवाना.

(क) वन्य प्राण्यासंबंधी अन्वेषण किंवा अभ्यास आणि तदनुषंगिक प्रयोजने ;

(ख) छायाचित्रण ;

(ग) वैज्ञानिक संशोधन ;

(घ) अभयारण्यात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीबरोबर वैध व्यवहार करणे.

(२) अभयारण्यात प्रवेश करण्याचा किंवा राहण्याचा परवाना, वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याला लादण्यास योग्य वाटतील किंवा विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन देण्यात येईल आणि अशा शर्ती परवान्यावर पृष्ठांकित करण्यात येतील.

३०. (१) कोणतीही व्यक्ती, श्वापदांच्या अभयारण्यात कोणत्याही जनावराची किंवा पक्ष्याची शिकार करणार नाही. परंतु, वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्यास, इतर जनावरांचे अधिक चांगल्या प्रकारे जतन करण्यासाठी किंवा इतर उचित व पुरेशा कारणांसाठी जनावरांची किंवा पक्ष्यांची शिकार करणे आवश्यक आहे अशी त्याची खात्री झाली असेल, अशा कोणत्याही विशेष प्रकरणी, त्याने प्राधिकृत केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या निदेशाखाली अशी जनावरे किंवा पक्षी यांची शिकार करण्यासाठी कोणत्याही व्यक्तींना प्राधिकार देणारा परवाना देता येईल. श्वापदांच्या अभयारण्यात परवान्याशिवाय शिकार करण्यास मनाई.

(२) पोकलम (१) अन्वये देण्यात येणाऱ्या परवान्यात, अशा परवानाधारकाला शिकार करता येईल अशा जनावरांची किंवा पक्ष्यांची संख्या व जाति विनिर्दिष्ट केलेली असेल.

३१. (१) वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्यास उचित व पुरेशा कारणासाठी, कोणताही परवाना देण्याचे नाकारता येईल किंवा या प्रकरणान्वये दिलेला कोणताही परवाना रद्द करता येईल. परवाना नाकारणे किंवा रद्द करणे.

(२) पोट कलम (१) अन्वये परवाना नाकारल्यामुळे किंवा रद्द केल्यामुळे पीडित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस पंधरा दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल व राज्य शासनाचा निर्णय अंतिम राहील.

३२. कोणतीही व्यक्ती, श्वापदांच्या अभयारण्यास आग लावणार नाही किंवा अशा अभयारण्यास धोका पोहोचेल अशा पद्धतीने कोणत्याही प्रकारे अग्नी पेटवणार नाही किंवा तो जळता ठेवणार नाही. आग लावण्यास मनाई.

## प्रकरण पाच

## मृगयाचिन्हे आणि पाळीव जनावरे व पक्षी

अनुज्ञप्तीशिवाय मृगयाचिन्हे व पाळीव जनावरे यांचा व्यवसाय करण्यास मनाई.

**३३.** कोणतीही व्यक्ती, या प्रकरणाच्या उपबंधांन्वये देण्यात आलेली मृगयाचिन्हे विक्रेत्याची अनुज्ञप्ति किंवा पाळीव जनावरांच्या विक्रेत्याची अनुज्ञप्ती याअन्वये व याअनुसार असेल त्या खेरीज करून, मृगयाचिन्ह विक्रेत्यांचा किंवा पाळीव जनावरांच्या विक्रेत्याचा व्यवसाय करणार नाही

मृगयाचिन्हे व पाळीव जनावरे यांच्या विक्रेत्यांची अनुज्ञप्ती.

**३४.** अंर्ज केल्यावर व विहित करण्यात येईल अशी फी भरल्यावर, वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्यास किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्रधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यास मृगयाचिन्ह विक्रेत्याची किंवा पाळीव आणि इतर जनावरांच्या विक्रेत्याची अनुज्ञप्ति देता येईल, आणि अनुज्ञप्तिधारकाला, अनुज्ञप्तीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जागेवर व शर्तीवर मृगयाचिन्ह विक्रेत्याचा किंवा पाळीव जनावराच्या विक्रेत्याचा व्यवसाय करण्याचा हक्क प्राप्त होईल. अशी प्रत्येक अनुज्ञप्ति, ती देण्यात आल्याच्या तारखेपासून एक वर्षापर्यंत, त्या कालावधीपूर्वी ती योग्यरीत्या तहकूब किंवा रद्द झालेली नसल्यास, वैध असेल.

मृगया-चिन्हांच्या व पाळीव जनावरांच्या विक्रेत्यानी अभिलेख व विवरणे तयार करणे.

**३५.** मृगयाचिन्ह विक्रेता किंवा पाळीव जनावरांचा विक्रेता विहित करण्यात येतील असे अभिलेख ठेवील व आपल्या व्यवसायासंबंधीची विहित करण्यात येतील अशी विवरणे वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याला सादर करील.

मालकीचे प्रमाणपत्र.

**३६.** वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्यास, कलम ३७ च्या प्रयोजनासाठी, त्याच्या मते ज्या व्यक्ती कडे मृगयाचिन्हाचा वैध कब्जा असेल अशा कोणत्याही व्यक्तीला मालकीचे प्रमाणपत्र देता येईल.

मृगयाचिन्हांची निर्यात व विक्री विनियमित करणे

**३७.** कोणतीही व्यक्ती, त्याच्याजवळ मृगयाचिन्हाच्या मालकीबाबतचे प्रमाणपत्र असल्याशिवाय, कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मृगयाचिन्हाची निर्यात करणार नाही किंवा देणगी, विक्री किंवा इतर प्रकारे ते हस्तांतरित करणार नाही. असे प्रमाणपत्र, निर्यातीच्या किंवा हस्तांतरणांच्या वेळी हस्तांतरितीकडे डाकेद्वारे पोचते करण्यात येईल किंवा पाठविण्यात येईल.

**स्पष्टीकरण**--या कलमाच्या प्रयोजनासाठी "निर्यात" याचा अर्थ, सीमाशुल्क सरहद्दीबाहेर नेण्यात येत असेल त्याखेरीज अन्यथा [1][महाराष्ट्र राज्या] बाहेर नेणे, असा होईल.

सरकारी मृगयाचिन्हे.

**३८.** मृतावस्थेत आढळलेले किंवा जीविताच्या किंवा मालमत्तेच्या संरक्षणासाठी अनुज्ञप्तीशिवाय किंवा चुकीने ठार मारलेले कोणतेही श्वापद किंवा ज्याबाबतीत या अधिनियमाच्या उपबंधांचा भंग करण्यात आला आहे असे कोणतेही श्वापद किंवा मृगयाचिन्ह हे सरकारी मृगयाचिन्ह आणि राज्य सरकारची मालमत्ता होईल.

---

[1]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम १३ अन्वये, "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्राबाहेर" या मजकुराच्या जागी, सदरहू मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][ **स्पष्टीकरण**.—या कलमामध्ये "श्वापद" यात अनुसूची दोन, तीन किंवा चार यामध्ये विर्निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही जनावराची किंवा पक्ष्याची मादी व पिल्लू यांचा समावेश असेल.]

**३९.** सरकारी मृगयाचिन्हाचा कोणत्याही मार्गाने कब्जा मिळविणारी कोणतीही व्यक्ती ४८ तासांच्या आत त्याबाबत निकटतम वन्य प्राणि अधिकारी, पोलीस किंवा वन अधिकाऱ्याला कळवील आणि तशी आवश्यकता पडल्यास असे मृगयाचिन्ह त्याच्या स्वाधीन करील. सरकारी मृगयाचिन्ह कब्जात असल्याबद्दल कळविणे.

**४०.** (१) कोणतीही व्यक्ती, कलम ३९ मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही एखाद्या अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय, कोणतेही सरकारी मृगयाचिन्ह आपल्या कब्जात ठेवणार नाही किंवा वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याच्या किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही व्यक्तीला देणगी, विक्री किंवा इतर प्रकारे कोणतेही सरकारी मृगचिन्ह हस्तांतरीत करणार नाही. सरकारी मृगयाचिन्हे बेकायदेशीर-पणे कब्जात ठेवणे किंवा त्यांचा बेकायदेशीर व्यापार करणे.

(२) पोट-कलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन केल्याबद्दल भरण्यात आलेल्या कोणत्याही खटल्यात, जे सिध्द करण्याची जबाबदारी आरोपीवर असेल असे तद्‌द्विरूध्द सिध्द होईपर्यंत, सरकारी मृगयाचिन्ह ज्याच्या कब्जात असल्याचे आढळून आले असेल अशा व्यक्तींच्या ते बेकायदेशीर कब्जात होते, असे गृहीत धरण्यात येईल.

**४१.** एखादा हत्ती किंवा गवा यास ठार करणारी प्रत्येक व्यक्ती, वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्यापुढे किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यापुढे, त्यास ठार मारल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा कोणत्याही विशेष प्रकरणी उक्त अधिकारी मान्य करील अशा अतिरिक्त कालावधीत, ज्या शिकारीच्या अनुज्ञप्तीनुसार त्याला ठार मारले असेल त्या अनुज्ञप्तीसह, त्यांचे हस्तिदंत किंवा शिंग दाखल करील. वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्या-पुढे हस्तिदंत किंवा शिंग दाखल करणे.

**४२.** कलम ४१ च्या उपबंधान्वये ज्या अधिकाऱ्यास हस्तिदंत किंवा शिंग दाखल करण्यात आले असेल त्याची, त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, असे हस्तिदंत किंवा शिंग वैधरित्या मिळवण्यात आल्याबद्दल खात्री झाल्यास, तो विहित केलेल्या पद्धतीने त्याचे वजन करवील, ते चिन्हित करवील व त्याची नोंद करावयास लावील आणि दाखल करणाऱ्या व्यक्तीला विहित नमुन्यातील मालकीसंबधीच्या प्रमाणपत्रासोबत ते परत करील. हस्तिदंत किंवा शिंग यांची नोंदणी करणे व त्यांवर ओळखचिन्ह करणे.

**४३.** कोणतीही व्यक्ती, यथास्थिती, वन्य प्राणिरक्षा अधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून मालकीचे प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय, असे कोणतेही हस्तिदंत किंवा शिंग कोणत्याही पद्धतीने हस्तांतरित करणार नाही. मालकीच्या प्रमाणपत्राशिवाय हस्तिदंत किंवा शिंग यांचे हस्तांतरण करता न येणे.

---

[१]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम १४ अन्वये, हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण सहा

### अपराधांचा प्रतिबंध, तपास आणि शास्ति

प्रवेश करणे, झडती घेणे, अटक करणे व स्थानबध्द करणे याबाबत अधिकार.

**४४.** (१) वन्य प्राणिरक्षा अधिकारी किंवा त्याने अधिकार प्रदान केलेला इतर कोणताही वन्य प्राणि अधिकारी किंवा वन किंवा कोणताही पोलीस अधिकारी यास, कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाविरुध्द अपराध केला आहे असे मानण्यास वाजवी कारणे असतील तर, —

(क) अशा कोणत्याही व्यक्तीला, त्याच्या कब्जात असलेले कोणतेही जनावर, पक्षी, मांस किंवा मृगयाचिन्ह किंवा या अधिनियमाच्या उपबंधांन्वये त्याला देण्यात आलेली किंवा त्याने बाळगणे आवश्यक असलेली कोणतीही अनुज्ञप्ति, परवाना किंवा इतर दस्तऐवज आपल्या निरीक्षणासाठी सादर करण्यास भाग पाडता येईल;

(ख) अशा व्यक्तीच्या ताब्यात असलेली कोणतीही जागा, जमीन, वाहन किंवा नौका यात प्रवेश करता येईल व झडती घेता येईल आणि त्याच्या ताब्यात असलेले कोणतेही प्रवासी सामान किंवा इतर वस्तू उघडता येतील व त्यांची झडती घेता येईल;

(ग) कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात असलेले व राज्य शासनाची मालमत्ता असल्याचे त्याला वाटत असेल असे, [१][असा कोणताही अपराध करण्यासाठी वापरलेले कोणतेही वाहन, शस्त्र, सापळा किंवा हत्यारे यासह] कोणतेही जनावर, पक्षी किंवा मांस किंवा मृगयाचिन्ह जप्त करता येईल आणि अशी व्यक्ती उपस्थित होईल व तिजविरुद्ध दाखल केलेल्या कोणत्याही आरोपाला उत्तर देईल याविषयी त्याची खात्री झाली नसेल तर, त्याला अधिपत्राशिवाय अटक व स्थानबद्ध करता येईल.

[२][(१-क) सहाय्यक वन्य प्राणि रक्षकाहून कमी दर्जाच्या नसलेल्या ज्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा त्याच्या दुय्यम अधिकाऱ्याने पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये कोणतेही वाहन, शस्त्र, सापळा किंवा हत्यारे जप्त केली असतील, अशा अधिकाऱ्यांस ज्या अपराधाबाबत जप्ती आणली असेल त्याबाबत खटला चालविण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यासमक्ष, आवश्यक करण्यात येईल; तेव्हा, मुक्त केलेली मालमत्ता दाखल करण्याकरिता या मालमत्तेच्या मालकाने बंधपत्र करून दिल्यानंतर, अशी मालमत्ता मुक्त करता येईल.]

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने, जे या अधिनियमाच्या उपबंधांन्वये ज्यासाठी अनुज्ञप्ति किंवा परवाना आवश्यक असेल असे कोणतेही कृत्य करताना ज्या कोणत्याही व्यक्तीस पाहील, अशा व्यक्तीस त्याची अनुज्ञप्ती किंवा परवाना दाखल करण्यास भाग पाडण्यासाठी अटकवणे व स्थानबद्ध करणे वैध राहील आणि त्या व्यक्तीने, यथास्थिती, आपली अनुज्ञप्ति किंवा परवाना दाखल करण्यास कसूर केल्यास, त्याने आपले नाव व पत्ता दिलेला नसेल व तो कोणत्याही समन्सचे किंवा त्याच्याविरुद्ध करण्यात येईल अशा इतर कार्यवाहीबाबत रीतसर उत्तर देईल अशी त्याने, अटक करणाऱ्या अधिकाऱ्याची इतर प्रकारे खात्री पटवली नसेल तर, त्याला अधिपत्राशिवाय अटक करता येईल.

(३) पूर्ववर्ती अधिकारांच्या अन्वये स्थानबध्द केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा जप्त केलेल्या वस्तूंना, त्याजबाबत विधिअनुसार कार्यवाही करण्यासाठी, तात्काळ दंडाधिकाऱ्यापुढे दाखल करण्यात येईल.

(४) ज्या कोणत्याही व्यक्तीने या कलमाद्वारा प्रदान केलेल्या अधिकारानुसार तिला दाखल करण्यास भाग पाडलेली जी कोणतीही गोष्ट वाजवी कारणाशिवाय, दाखल करण्यास कसूर केली असेल, अशी व्यक्ती, या अधिनियमाविरुद्ध केलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरेल.

---

[१]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम १५ (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम १५ (दोन) अन्वये पोट-कलम (१-क) समाविष्ट करण्यात आले.

पंढरपूर ज्ञानेश्वर नागरगोजे

४५. (१) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करणारी किंवा कोणतीही अनुज्ञप्ति किंवा परवाना यांच्या कोणत्याही शर्तीचा भंग करणारी कोणतीही व्यक्ती, अधिनियमाविरुद्ध केलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरेल आणि दोषसिद्धीनंतर तिला, सहा महिनेपर्यंत वाढवल्या जाणाऱ्या कारावासाची किंवा ५०० रुपयांपर्यंत वाढवल्या जाणाऱ्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील. शास्ती.

(२) जेव्हा कोणतीही व्यक्ती या अधिनियमाविरुद्ध केलेल्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरली असेल तेव्हा, या अपराधाचा खटला चालवणाऱ्या न्यायालयास, ज्याबाबत अपराध करण्यात आला असेल असे कोणतेही जनावर, पक्षी, मांस किंवा मृगयाचिन्ह आणि ज्याच्या सहाय्याने अपराध केला असेल असे शस्त्र किंवा सापळा राज्य शासनाच्या स्वाधीन राहील, आणि या अधिनियमाच्या उपबंधान्वये अशा व्यक्तीने धारण केलेली अनुज्ञप्ति किंवा परवाना रद्द करण्यात येईल, असा आदेश देता येईल.

(३) अशाप्रकारे अनुज्ञप्ति किंवा परवाना रद्द करणे ही, अशा अपराधासाठी देण्यात आलेल्या इतर कोणत्याही शिक्षेशिवाय जास्तीची शिक्षा असेल.

[1][४५ (क). या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करणारी जी कोणतीही व्यक्ती, कलम ४४ मध्ये उल्लेखिलेल्या कारणांस्तव मालमत्ता जप्त करण्याचा बहाणा करून संत्रासजनक रीतीने व अनावश्यकपणे कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता जप्त करील, अशा व्यक्तीस दोषीसिद्धीनंतर सहा महिन्यापर्यंत वाढविल्या जाऊ शकणाऱ्या मुदतीसाठी कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढवल्या जाऊ शकणाऱ्या दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.] अन्याय्य जप्तीसाठी शिक्षा.

[2][४५ (ख) (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा, वन्य प्राणिरक्षा अधिकारी किंवा वनसंरक्षकाच्या दर्जापेक्षा कमी नसलेला कोणताही अधिकारी, यास,— अपराध आपसात मिटवण्याचा अधिकार.

(क) या अधिनियमाखाली अपराध केला असल्याबद्दल ज्या व्यक्तीविषयी वाजवी संशय असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून, या अपराधाची आपसात तडजोड करून, विशेष मोठ्या श्वापदाच्या संबंधात अपराध झाला असल्यास एक हजार रुपयांपेक्षा अधिक होणार नाही एवढ्या आणि इतर कोणत्याही अपराधाच्याबाबतीत पाचशे रुपयांहून अधिक होणार नाही एवढ्या रकमेचे प्रदान स्वीकारण्यासाठी किंवा अशा अधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार अशा व्यक्तीकडून विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत तेवढीच रक्कम भरण्यासंबंधी लेखी वचन स्वीकारण्यासाठी ;

(ख) जेव्हा, कलम ४४ अन्वये कोणतीही मालमत्ता जप्त करण्यात आली असेल, तेव्हा, अशा अधिकाऱ्याने अंदाजित केलेले त्याचे मूल्य चूकते केल्यावर, किंवा अशा अधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार संबंधित व्यक्तीकडून विनिर्दिष्ट कालावधीत तिचे अंदाजित मूल्य प्रदान करण्याबाबत लेखी वचन स्वीकारल्यावर ती मालमत्ता मुक्त करण्यासाठी,

अधिकार प्रदान करता येईल.

(२) अशा अधिकाऱ्यास, अशी रक्कम किंवा असे मूल्य किंवा या दोन्हीचे प्रदान केल्यानंतर किंवा अशा अधिकाऱ्याने यथास्थिती, असे वचन किंवा वचने स्वीकारल्यानंतर जर संशयित व्यक्ती अभिरक्षेमध्ये असेल तर तिला सोडून देण्यात येईल, जप्त केलेली मालमत्ता असल्यास ती मुक्त करण्यात येईल आणि अशा व्यक्तीविरुद्ध अपराधाबाबत कोणतीही अतिरिक्त कार्यवाही करण्यात येणार नाही ;

परंतु, अशा कोणत्याही वचनपत्रानुसार देय असलेली कोणतीही रक्कम, देय असेल त्यावेळी चुकती करण्यात आली नाही तर, ती जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य ठरेल.]

---

[1]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम १६ अन्वये कलम ४५-(क) समाविष्ट करण्यात आले.

[2]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ९ अन्वये कलम ४५-(ख) समाविष्ट करण्यात आले.

न्यायालयाने अपराधाची दखल केव्हा घ्यावी.

४६. कोणतेही न्यायालय,—

(१) वन्य प्राणिरक्षा अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी किंवा कोणताही वन किंवा पोलीस अधिकारी किंवा राज्य शासनाने, याबाबतीत प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी याने तक्रार केली किंवा प्रतिवृत्त दिले असल्याखेरीज ; आणि

(२) अपराध ज्या तारखेस घडल्याचे अभिकथित केले असेल, त्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत खटला दाखल केला नसेल तर,—

या अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

इतर विधिंच्या प्रवर्तनास प्रतिबंध नसणे.

४७. या अधिनियमातील कोणत्याही बाबीमुळे, कोणत्याही व्यक्तीवर, या अधिनियमानुसार अपराध ठरणारे कोणतेही कृत्य किंवा अकृति यासाठी इतर कोणत्याही विधिअन्वये खटला भरला जाण्यास अथवा अशी व्यक्ती या अधिनियमाद्वारा उपबंधित केली असेल त्यापेक्षा अशा इतर विधिअन्वये कोणत्याही मोठ्या शिक्षेसाठी किंवा शास्तीसाठी जबाबदार ठरविण्यास प्रतिबंध होतो, असे समजण्यात येणार नाही ;

परंतु, कोणत्याही व्यक्तीला एकाच अपराधासाठी दोनदा शिक्षा होणार नाही.

---

## प्रकरण सात

### संकीर्ण

नियम बनविण्याचा अधिकार.

४८. [१][(१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारा, नियम तयार करता येतील.]

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस हानी न पोचवता, खालीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी असे नियम तयार करता येतील :—

(क) या अधिनियमाच्या उपबंधान्वये मान्य केलेला, दिलेला, करण्यात आलेला किंवा सादर केलेला कोणताही अर्ज, अनुज्ञप्ति, परवाना, नोंदणी, प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र, विवरण किंवा इतर दस्तऐवज यासाठी वापरावयाचे नमुने व त्यासाठी कोणतीही फी असल्यास, अशी फी ;

(ख) या अधिनियमान्वये, ज्या शर्ती अधीन कोणतीही अनुज्ञप्ति किंवा परवाना देता येईल, अशा शर्ती;

(ग) कोणत्याही अनुज्ञप्तीधारकाने ठार मारलेल्या किंवा पकडलेल्या श्वापदाच्या नोंदीचा जवळ बाळगावयाचा किंवा सादर करावयाचा तपशील ;

(घ) नैसर्गिक प्राणिजातीला त्रास होण्यापासून प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने श्वापदांच्या अभयारण्यातील वसाहतीवरील नियंत्रण ;

(ड.) पाळीव व इतर जनावरे यांच्या विक्रीचे आणि वन्य जनावरे व पक्षी यांच्यापासून मिळालेल्या मृगयाचिन्हाच्या विक्रीचे विनियमन ;

(च) हत्ती किंवा गवा यांचे नोंदणीसाठी आणलेले हस्तिदंत किंवा शिंग यांच्या नोंदणीची पद्धती ;

(छ) राज्य शासनाचा मते, या अधिनियमाच्या उद्देश पार पाडण्याकरिता ज्यासाठी उपबंध करणे इष्ट किंवा आवश्यक असेल, अशा इतर कोणत्याही बाबी.

(३) या कलमान्वये नियम तयार करण्याच्या अधिकाराचा, यापूर्वीच्या प्रकाशनातील शर्तीच्या अधीन राहून वापर करण्यात येईल.

---

[१]मूळ मजकुराच्या जागी, सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम १७(अ) अन्वये पोट कलम (१) घालण्यात आले.

[१][(४) याकलमान्वये तयार केलेले सर्व नियम, ते तयार करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येतील आणि ते अशाप्रकारे मांडण्यात येतील अशा अधिवेशनाच्या किंवा त्यानंतर लगेच येणाऱ्या अधिवेशनाच्या दरम्यानं राज्य विधान मंडळ करील अशा सुधारणाच्या अधीन असतील आणि ते शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येतील.]

**४९.** वन्य जनावरे व अन्य पक्षी यांच्या दुर्मिळ जातींचे जतन व संरक्षण करणे, अशा जनावरांचे व पक्ष्याचे त्यांच्या जननकालात संरक्षण करणे, या आणि अशासारख्या कोणत्याही प्रयोजनासाठी, राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारा, कोणत्याही अनुसूचीमध्ये भर घालता येईल किंवा त्यात फेरफार करता येईल, आणि अशी भर किंवा असा फेरफार, जणु काही या अधिनियमान्वये करण्यात आला असल्याप्रमाणे, अंमलात येईल. अनुसूचींमध्ये सुधारणा करण्याचे अधिकार.

**५०.** कलम ३८ ते ४० (दोन्ही समाविष्ट करून) याच्या उपबंधांच्या अधीन, या नियमातील कोणतीही बाब,— जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण.

(१) कोणत्याही जमिनीच्या भोगवटादाराने, जमिनीवरील उभ्या पिकाच्या किंवा गुराढोरांच्या संरक्षणासाठी कोणतेही वन्य जनावर किंवा वन्य पक्षी ठार मारण्यास किंवा पकडण्यास ;

(२) स्वतःच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या संरक्षणासाठी सद्हेतूने कोणत्याही वन्य जनावरास किंवा वन्य पक्ष्यास ठार मारण्यास किंवा पकडण्यास, प्रतिषिध्द करणार नाही :

परंतु, असे संरक्षण करणे आवश्यक झाले असता कोणत्याही श्वापदाची शिकार करणारी किंवा या अधिनियमाचे कोणतेही उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, या कलमातील कोणत्याही बाबीनुसार निर्दोष ठरणार नाही.

**५१.** या अधिनियमाद्वारा प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तींचा वापर करणारे सर्व वन्य प्राणि अधिकारी व इतर अधिकारी यांना, भारतीय दंड संहितच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल. वन्य प्राणि अधिकारी लोकसेवक असणे

**५२.** या अधिनियमान्वये, सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुध्द, कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही दाखल केली जाणार नाही. सद्भावना-पूर्वक कृति करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण

**५३.** राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारा कोणत्याही व्यक्तीला, त्याच्या नावाने किंवा त्याच्या पदामुळे किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तींना या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधांपासून सूट देता येईल. सूट देण्याचे अधिकार.

[२][ **५३ क** . राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारा, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा (कोणत्याही शर्ती असल्यास) त्या शर्तीच्या अधीन अनुसूची एक, दोन, तीन किंवा चार मधील कोणत्याही नोंदीमध्ये भर घालता येईल, ती वगळता येईल किंवा तीत फेरफार करता येईल आणि अशी अधिसूचना काढल्यानंतर, अशा अनुसूचीमध्ये सुधारणा करण्यापूर्वी केलेल्या किंवा जी गोष्ट करावयाची राहून गेली असेल अशा गोष्टीस बाध येऊ न देता, अशी अनुसूची तद्नुसार सुधारण्यात आल्याचे समजण्यात येईल.] अनुसूचींमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

---

[१]मूळ मजकुराच्या जागी, सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम १७(ब) अन्वये पोट कलम (४) घालण्यात आले.

[२]सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम १८ अन्वये कलम ५३ अ दाखल करण्यात आले.

निरसन. *५४ [१][ पुनर्रचनापूर्व मुंबई राज्याला ] लागु असलेल्या वन्य पक्षी व जनावरे संरक्षण अधिनियम, १९१२, यांचे याद्वारा, निरसन करण्यात येत आहे :

परंतु, उक्त अधिनियमान्वये देण्यात आलेली व या अधिनियमाचा प्रारंभ होण्याच्या तारखेला अंमलात असलेली कोणतीही अनुज्ञप्ति अमंलात असण्याचे चालू राहील आणि ती या अधिनियमाच्या कलम १३ अन्वये देण्यात आल्याचे समजण्यात येईल.

आणखी निरसन व व्यावृत्ति. [२][ ५५. मुंबई वन्य जनावरे आणि वन्य पक्षी संरक्षण (व्याप्ति व सुधारणा) अधिनियम, १९६०, यास प्रारंभ झाल्यानंतर खालील विधींचे निरसन होईल :-

(क) मध्यप्रांत व वऱ्हाड शिकारीसंबंधी अधिनियम, १९३५.

(ख) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ क्षेत्राला लागू असलेला वन्य पक्षी आणि जनावरे संरक्षण अधिनियम, १९१२.

(ग) शिकारीसंबंधी विनिमय, फसली १३५४ :

परंतू, अशा निरसनामुळे.-

(एक) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही विधीच्या पूर्वीच्या प्रर्वर्तनावर किंवा तद्धीन योग्यरीत्या केलेल्या किंवा करू दिलेल्या कोणत्याही गोष्टीवर परिणाम होणार नाही ;

(दोन) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही विधीअन्वये संपादन केलेला, प्रोद्भूत असा कोणताही अधिकार, विशेषाधिकार, बंधन किंवा पत्करलेले दायित्व यावर परिणाम होणार नाही ;

(तीन) अशा रीतीने निरसित केलेल्या, कोणत्याही विधीविरुध्द केलेल्या कोणत्याही अपराधांबद्दल झालेली कोणतीही शास्ति, समपहरण किंवा शिक्षा यावर परिणाम होणार नाही ; किंवा

(चार) उपरोक्तप्रमाणे असा कोणताही अधिकार, विशेषाधिकार, बंधन, दायित्व, शास्ति, समपहरण किंवा शिक्षा यासंबंधातील कोणतीही बारीक तपासणी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना याजवर परिणाम होणार नाही ;

आणि जणुकाही उपरोक्त विधींचे निरसन करण्यात आले नाही असे समजून अशी कोणतीही बारीक तपासणी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना सुरु करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा लादता येईल :

आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकांच्या अधीन, अशा कोणत्याही विधीअन्वये (दिलेल्या कोणत्याही अधिसूचना, आदेश, प्रमाणपत्रे, नोटिशी किंवा पावत्या, केलेले अर्ज, दिलेले परवाने किंवा अनुज्ञप्ति, अनुज्ञप्ति तहकूब किंवा रद्द करणे, तसेच दिलेली माफी, यांसह) पार पाडलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कार्यवाही, ती या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांन्वये पार पाडली किंवा केली असल्याचे समजण्यात येईल, आणि तिचे या अधिनियमान्वये पार पाडलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा केलेल्या कार्यवाही द्वारे अधिक्रमण होईपर्यंत, त्यानुसार अंमलात असल्याचे चालू राहील.]

---

* कलम ५४ फेरफार न केलेले म्हणून राहील (महाराष्ट्र विधि अनुकूलन आदेश, १९६० पहा).

[१] "मुंबई राज्याला" या मजकुराच्या जागी, मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये सदरहू मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] कलम ५५ हे, सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम १९ अन्वये कलम समाविष्ट करण्यात आले.

**मुंबई वन्य जनावरे आणि वन्य पक्षी संरक्षण अधिनियम १९५१**

## [1][ अनुसूची एक.

[कलम २ (ढ) व ५३ क पहा.]

( उपद्रवकारक प्राणी ).

१. मुंगूस.

२. जवादी मांजर.

३. रान मांजर (वाघ, सिंह, बिबळे व चित्ता वगळून).

४. रान कुत्रा.

५. कुरतडणारी जनावरे (ससा, मोठी खार व उडणारी खार याखेरीज).

६. कोल्हा.

७. माकड.

८. वाघुळ.

९. कावळा.

[2][ * * * * * *]

## अनुसूची दोन.

[कलम २ (ग) व (ठ) आणि कलम ५३ क पहा.]

( लहान श्वापद ).

१. चोचीवर ठिपके असलेले (स्पॉट-बिल) बदक.

२. नुकटा.

३. शीळ घालणारा (लहान व मोठा) पाणकोंबडा.

४. कॉटन टील (जातिविशिष्ट पाणकोंबडा).

५. बदक, हंस व राजहंस (वर उल्लेखिलेल्या प्रकाराखेरीज आणि गुलाबी रंगाच्या डोक्याची बदके यांखेरीज इतर सर्व प्रकारचे ).

[1] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ११, कलम २० अन्वये मूळ अनुसूचीच्या जागी अनुसूची एक ते बार, घालण्यात आल्या.

[2] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम १० अन्वये नोंदी १० व ११, वगळण्यात आल्या.

## अनुसूची दोन—चालू

६. पाणपक्षी (करकोचा, विशिष्ट जातीचे बगळे (इग्रेटस) व क्रौंच (हेरौन्स) वगळून).

७. करकोचा (सारस पक्षी सोडून).

८. माळढोक [1][मोठ्या भारतीय माळढोक पक्ष्यासह].

९. सँड ग्राऊज (सर्व जाती).

१०. तीक्ष्ण नखीचे कोंबडे (स्पर फाऊल).

११. रान कोंबडे जंगल (जंगल फाऊल).

[2][ * * * * * *]

१३. तितर (करडा व रंगीत).

१४. लाव पक्षी (सर्व जाती).

१५. लहान कबुतरे व कबुतरे (सर्व जाती).

[3][ * * * * * *]

१७. ससा (सर्व जाती).

१८. तरस.

१९. लांडगा.

२०. रानडुक्कर.

२१. चिंकार (फक्त नर).

२२. लहान हरिण (बार्किंग डिअर).

[4][२३. लांब पंखाचा लहान पोपट.

२४. हिंस्त्र पक्षी.]

---

[1]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ११(अ) अन्वये (मोठ्या हिंदुस्थानी तिलोराखेरीज) यामजकुराच्या जागी सदरहू मजकुर समाविष्ट करण्यात आला.

[2]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ११(ब) अन्वये नोंद १२ वगळण्यात आली.

[3]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ११(क) अन्वये नोंद १६ वगळण्यात आली.

[4]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम ११(ड) अन्वये नोंदी २३ व २४, या जादा घालण्यात आल्या.

## अनुसूची तीन

कलम २ (ख) व (ग) आणि कलम ५३ (क) पहा.

(मोठे श्वापद).

१. नीलगाय.

२. काळवीट [1][(३० सेटिंमीटरहून) अधिक लांबीची शिंगे असलेला फक्त नर.]

३. चतुःशृंगी हरिण.

४. सांबर [2][(७५ सेंटिमीटरहून) अधिक लांबीची कठीण शिंगे असलेला फक्त नर].

५. चितळ [3][(५० सेंटिमीटरहून) अधिक लांबीची कठीण शिंगे असलेला फक्त नर].

६. बिबळ्या वाघ.

७. वाघ.

८. अस्वाल.

९. सुसर.

## अनुसूची चार

कलम २ (ख) व (ग) आणि कलम ५३ (क) पहा.

(विशेष मोठे श्वापद).

१. गवा : शिंगांची मापे, खालीलपैकी निदान एका मर्यादेपर्यंत असतील तर, फक्त नर :—

(अ) शिंगांच्या बाहेरच्या कडांचे अंतर जेथे सर्वाधिक असेल त्याठिकाणीचे [4][८३ सेंमी.] इतके अंतर;

(ब) शिंगाच्या बुंध्याशी [5][ ४५ सेंटिमीटरचा] घेर.

२. हत्ती.

३. रान म्हैस किंवा रान रेडा.]

---

[1]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम १२(अ) अन्वये, "१२ इंच" या मजुकराऐवजी, सदरहू मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम १२(ब) अन्वये, "३० इंच" या मजुकराऐवजी, सदरहू मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम १२(क) अन्वये, "२० इंच" या मजुकराऐवजी, सदरहू मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम १३ अन्वये, "३३ इंच" या मजुकराऐवजी, सदरहू मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम ३, कलम १३ अन्वये, "१८ इंचाचा" या मजुकराऐवजी, सदरहू मजकूर समाविष्ट करण्यात आला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर